# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०६/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## पो.स्टे. खापा हद्दीत जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०९/०६/२०२४ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे आदेशाने स्टाफ पोस्टे खापा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, बाजार चौक खापा येथील गाडीगोने किराना दुकानासमोरील नितेश नंदनवार यांचे जुने घरात काही इसम हे ५२ ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळ खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पोस्टे खापा हद्दीत गाडीगोने किराना दुकानासमोरील नितेश नंदनवार यांचे जुने घरात रेड केली असता काही इसम हे ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळताना दिसुन आले. त्यामध्ये **आरोपी नामे— १) लिलाधर महादेव शोधले वय ४२ वर्ष रा. कोथूळना ता. सावनेर जि. नागपूर २) विजय दयाराम निस्ताने वय ३९ वर्ष रा. निमतलाई ता. सावनेर जि. नागपुर ३) सुभाष मोहन पराते वय ५० वर्ष, रा. वार्ड नं ९ किल्लापुरा ता. सावनेर जि. नागपुर ४) गणेश सुखदेव बांगडे वय ३४ वर्ष, रा. वार्ड नं १ गडेवालपुरा खापा ता. सावनेर जि. नागपुर ५) नितेश सुधाकर नंदनवार वय ३२ वर्ष, रा वार्ड नं २ देना बॅक जवळ बाजार चौक खापा ६) नरेन्द्र बुलकाजी पराते वय ६० वर्ष, रा वार्ड नं ८ खेडकर ले आउट सावनेर ता सावनेर जि नागपुर** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपींच्या ताब्यातून ५२ ताशपत्ते व एकुण नगदी १०९५० रु व मोबाईल किंमती एकुण २०५००/— रु तसेच घटनास्थळाचे रोड लगत उभे असलेले मो.सा क्र एम.एच. ४० बी. ए ३०९६ अंदाजे किंमती ३००००/— रु तसेच मोसा क्र एम. एच ४०/बी. वाय. ८९५० अंदाजे किंमती ३५०००/— रु तसेच मो.सा क्र एम.एच ४०/क्यु २७६५ अंदाजे किंमती १५०००/— रु असे एकुण किंमती १,११,४५० रु. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूद्ध पोस्टे खापा येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के, सपोनि अनिल राऊत, सफौ गणेश राय, पोहवा माणिक शेरे, पोशि मिलींद मोरे, पियुष वाढीवे यांनी पार पाडली.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
## वाहनासह एकुण १५,५७,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०९/०६/२०२४ रोजी फिर्यादी हे पोस्टे मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा माथनी टोलनाका माथनी शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) लोड करून चोरटी वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा माथनी टोलनाका येथे अवैध रेती संबंधाने अचानक नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम एच ४० सी वी —७७५० चा चालक आरोपी नामे— **अक्षय शामराव लुटे वय २५ वर्ष रा. बासोरा पो. दवळीपार जि. भंडारा** यास थांबवून चेक केले असता अवैदयरीत्या विनापरवाना रेती चोरी वाहतुक करतांना आढळल्याने आरोपीच्या ताब्यातून टिप्पर मध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रूपये व .ट्रक क्र. एम एच ४० सी वी —७७५० किंमती १५,००,०००/—रूपये आणी एक विवो कंपनीचा मोबाईल किंमती १२,०००/—रूपये दुसरा विवो कंपनीचा मोबाईल किंमती १५,०००/—रूपये असा एकुण १५,५७,०००/— रूपयेचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त करून आरोपी १) **अक्षय शामराव लुटे वय २५ वर्ष रा. बासोरा पो. दवळीपार जि. भंडारा २) विधीसंघर्ष बालक** यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल व त्यांचा स्टाफ यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर